RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ११६] गुरूवार, जुलै ३०, २०२६/श्रावण ८, शके १९४८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४१८**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ जुलै २०२६.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम, २०२४.**

क्रमांक टीईआर ०८१६/प्र.क्र.२३८/विशा-१ब.— महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम, २०२४ (२०२५ चा महा. ४७) याच्या कलम ५ च्या पोट-कलम (३) व कलम १८ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, सल्लागार मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या सेवेच्या अटी व शर्ती विहित करण्याकरिता पुढील नियम तयार करीत आहे :—

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**— (१) या नियमांस, महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा सल्लागार मंडळ (सेवेच्या अटी व शर्ती) नियम, २०२६, असे म्हणावे.

(२) हा नियम, **महाराष्ट्र शासकीय राजपत्रात** त्याच्या प्रसिद्धीच्या दिनांकास अंमलात येईल.

२. **व्याख्या.**— (१) या नियमांत, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसल्यास,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र विशेष जन सुरक्षा अधिनियम, २०२४ (२०२५ चा महा. ४७) असा आहे;

(ख) "सल्लागार मंडळ" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ५ अन्वये घटित केलेले सल्लागार मंडळ, असा आहे;

(ग) "अध्यक्ष" याचा अर्थ, सल्लागार मंडळाचा अध्यक्ष, असा आहे;

(घ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ङ) "सदस्य" याचा अर्थ, सल्लागार मंडळाचा एखादा सदस्य, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल.

**३. पदावधी.**— (१) अध्यक्ष व सदस्य हे उक्त पदावर रूजू होण्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीकरिता किंवा वयाच्या सत्तर वर्षांपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल ते पद धारण करतील.

(२) अध्यक्ष व सदस्य हे वयाच्या सत्तर वर्षांपर्यंत पुनर्नियुक्तीसाठी, पात्र असतील.

**४. मानधन व भत्ते.**— (१) अध्यक्ष व सदस्य, राज्य शासनाने, वेळोवेळी, काढलेल्या आदेशाद्वारे, विनिर्दिष्ट केलेल्या अशा दराने प्रत्येक प्रकरणाकरिता किंवा संदर्भाकरिता मानधन मिळण्यास हक्कदार असतील.

(२) अध्यक्ष व सदस्य त्यांची कर्तव्ये पार पाडत असताना हक्कदार असतील असे सर्व प्रकारचे भत्ते व इतर प्रदानांचा अध्यक्ष व सदस्य यांना उक्त प्रमाणे प्रदेय असलेल्या मानधनात समावेश असल्याचे मानण्यात येईल.

(३) राज्य शासन, आवश्यक असल्यास, सल्लागार मंडळाच्या प्रभावी कामकाजाकरिता आवश्यक असलेली कार्यालयीन व्यवस्था, फर्निचर, लेखनसामग्री व कर्मचारीवर्ग पुरविण्याची व्यवस्था करील.

**५. राजीनामा.**— (१) अध्यक्ष किंवा एखादा सदस्य, राज्य शासनाला लेखी स्वरूपात राजीनामा सादर करून पदाचा राजीनामा देऊ शकेल.

(२) राजीनामा पुढीलप्रमाणे अंमलात येईल,—

(एक) राज्य शासनाने तो स्वीकारल्याच्या दिनांकापासून; किंवा

(दोन) अशी नोटीस सादर केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यावर, ती तत्पूर्वी मागे घेतली नसेल तर;

यांपैकी जे अगोदर घडेल ते.

**६. सल्लागार मंडळाची कार्यपद्धती.**— एखाद्या सदस्याचे पद रिक्त असल्यास, सल्लागार मंडळाची कार्यपद्धती विधिअग्राह्य असणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार जावळे,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 27th July, 2026.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA SPECIAL PUBLIC SECURITY ACT, 2024.

No. TER 0819/C.R.238/Spl-1B.— In exercise of the powers conferred by sub-section (*3*) of section 5 and sub-section (*1*) of section 18 of the Maharashtra Special Public Security Act, 2024 (Mah. XLVII of 2025), the Government of Maharashtra hereby frames the following rules for prescribing the term and conditions of service of the Chairperson and Members of the Advisory Board, as follows, namely :—

**1.** *Short title and commencement*.— (*1*) These rules may be called the *Maharashtra* Special Public Security Advisory Board (Term and Conditions of Service) Rules, 2026.

(*2*) It shall come into force on the date of their publication in the *Maharashtra Government Gazette*.

**2.** *Definitions*.— (*1*) In these Rules, unless the context otherwise requires,—

*(a)* "Act" means the Maharashtra Special Public Security Act, 2024 (Mah. XLVII of 2025);

*(b)* "Advisory Board" means the Advisory Board constituted under section 5 of the Act;

*(c)* "Chairperson" means the Chairperson of the Advisory Board;

*(d)* "Government" means the Government of Maharashtra;

*(e)* "Members" means a Member of the Advisory Board.

(*2*) Words and expressions not defined in these Rules shall have the meanings assigned in the Act.

**3.** *Term of Office*.— (*1*) The Chairperson and Members shall hold office for a term of three years from the date of joining the office or till the age of seventy years, whichever is earlier.

(*2*) The Chairperson and Members may be eligible for reappointment, till the age of seventy years.

**4.** *Honorarium and Allowances*.— (*1*) The Chairperson and Members shall be entitled to receive an honorarium for each case or reference at such rate as may be specified by the State Government, by an order issued, from time to time.

(*2*) The honorarium payable to Chairperson and Members shall be deemed to include all allowances and other payments to which the Chairperson or Members are entitled in discharge of their duties.

(*3*) The State Government shall make arrangements for providing office accommodation, furniture, stationery, and staff required for the efficient functioning of the Advisory Board, if necessary.

**5.** *Resignation*.— (*1*) The Chairperson or a Member may resign from office by submitting resignation in writing to the State Government.

(*2*) The resignation shall take effect,—

*(i)* on the date of its acceptance by the State Government; or

*(ii)* upon the expiry of three months from the date of submission of such notice, unless withdrawn earlier;

whichever is earlier.

**6.** *Proceedings of Advisory Board*.— No vacancy in the office of a Member shall invalidate the proceedings of the Advisory Board.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR JAWALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.